मायक्रोस्कोप व धुर फवारणी यंत्राची खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत (शुध्दीपत्रक)

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक खरेदी-२०१८/प्र.क्र.७२/आरोग्य -८
गो.ते. रुग्णालय संकुल ,मंत्रालय मुंबई- ४००००१.
दिनांक - २९ मार्च २०१९.

वाचा-

१) शासन निर्णय क्रमांक:-खरेदी २०१८/प्रक्र.७२/आरोग्य-८ दिनांक २२.३.२०१८.
२) आरोग्य सेवा संचालनालय यांचे पत्र क्र-संआसे/साथरोग कक्ष-६/Binocular Microscope खरेदीच्या देयकाच्या फरकाची रक्कम/९६/२०१९, दिनांक २७.३.२०१९.

प्रस्तावना:-

शासन निर्णय दिनांक २२.३.२०१८ अन्वये मायक्रोस्कोप यंत्र खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांनी प्रती रुपये २२,५००/-प्रमाणे १०० नग करीता रुपये २२,००,०००/- इतके वर्ग केले असून हाफकिन महामंडळाने प्रती नग रुपये २४,६६५/-प्रमाणे दर निश्चित करुन कळविले असून एकुण १०० नग खरेदीसाठी रुपये २४,६६,५००/- इतक्या रक्कमेतून वर्ग केलेली रक्कम रुपये २२,००,०००/-इतकी वजाती करुन वाढीव रक्कम रुपये २,६६,५००/- इतक्या रक्कमेची मंजूरी देण्याची बाब विचाराधीन आहे.

शुध्दीपत्रक:-

शासन निर्णय दिनांक २२.३.२०१८ मधील विवरणपत्र अ.क्र.२ मधील प्रती नग अंदाजित किंमत या कॉलम मध्ये रुपये २४,६६५/- असे वाचावे व त्यानुसार उर्वरित रक्कम रुपये २,६६,५००/- इतक्या खर्चास लेखाशिर्ष “२२१०”वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य-केंद्र पुरस्कृत योजना राज्य हिस्सा (०१) (४७) राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम-२१ पुरवठा व सामुग्री (२२१०५१५७) या लेखाशिषार्तगत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात शिल्लक असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थलावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३२८१६०२३१२६१७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.04.01 16:24:10 +05'30'

(ज.स.तडवी)
अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) व्यवस्थापकिय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. परेल, मुंबई.
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४) सह संचालक, आरोग्य सेवा (खरेदीकक्ष)आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
५) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
६) सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११) जिल्हा कोषागार अधिकारी पुणे
१२) निवडनस्ती (आरोग्य-८)